

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

दधाना करपद्माभ्याम
कमण्डलू।
देवीप्रसीदतु मयि
ब्रह्मचारिण्यनुत्त

पृष्ठे : १६+४ = २०, किंमत : ₹ ३.००

सातारा, सोमवार, दि. ३ ऑक्टोबर २०१६

आजचा रंग : पांढरा




डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## कोरेगावात जिल्हास्तरीय युवा महोत्सवास प्रतिसाद

कोरेगाव : रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठांतर्गत ३६ वा सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कॉलेजमधील डी. पी. कला मंच, कर्मवीर कला मंच, बीसीए हॉल, इनडोअर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स व खुल्या रंगमंचावर विविध कार्यक्रमांचे सादरीकरण झाले, त्यास टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद मिळाला.

शनिवारी कॉलेजच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे शानदार उद्घाटन झाले. त्यानंतर सहभागी कॉलेजसमधील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, लोककला, एकांकिका, पथनाट्य, लघुनाट्य, सुगम गायन, समूहगीत, वाद-विवाद व वक्तृत्व अशा १३ कला प्रकारांमध्ये आपले कला कौशल्य सादर केले. महोत्सवामध्ये जिल्ह्यातील ७५ महाविद्यालये सहभागी झाली आहेत. (प्रतिनिधी)